वार्ता टिपण दि. २७/०७/२०१८

## सराईत गुन्हेगारास हॉटेल व्यवसायीकास खंडणी मागितल्या प्रकरणी अटक

आरोपी इसम नामे देवराज थापा याने त्याचा वापरता मो.क्र. ८४११९४०४३४ यावरुन बंडगार्डन परिसरातील हॉटेल क्वालीटी इंन मिंट, पुणे येथील मॅनेजेर प्रकाश जयशंकर शुक्ला, वय-२८ वर्ष, रा. स.नं. १२ लक्ष्मीनगर, येरवडा, पुणे यांना त्यांचे हॉटेलचा मोबाईल व स्थानीक फोनवर फोन करुन कुप्रसिध्द गँगस्टर हेमंत पुजारी याचे नाव सांगुन प्रोटेक्शन मनी म्हणून दरमहा ५० हजार रुपयाची खंडणी मागितली होती. खंडणी दिली नाही तर हॉटेल मध्ये येवून फायर करुन जिवे ठार मारण्याची धमकी दिली होती. त्याबाबत बंडगार्डन पो.स्टे. गु.र.नं. २०३/१८ भा.दं.वि.क. ३८७ प्रमाणे वर नमुद आरोपी विरुध्द गुन्हा दाखल आहे.

वर नमुद देवराज थापा याचा वापरता मो.क्र. ८४११९४०४३४ याचे तांत्रीक माहिती वरुन वर नमुद आरोपी इसमाचा पुणे शहरात विविध ठिकाणी शोध घेत असताना पो.हवा. प्रमोद मगर व धिरज भोर यांना मिळालेल्या माहितीवरुन बाणेर परिसरातील एका हॉटेल मधून इसम नामे चार्लस ऊर्फ देवराज जेम्स थापा वय २७ वर्षे धंदा नोकरी, रा. मीडीया पार्क सोसायटी, कलाशंकर नगर रोडजवळ, बि.टी कवडे रोड, मुंढवा पुणे यास पकडून त्याच्याकडे केलेल्या अधिक तपासात त्याने वर नमुद गुन्हा केल्याची कबुली दिली आहे. त्यानंतर त्यास दाखल गुन्ह्यात दि. २६/०७/२०१८ रोजी अटक केली आहे.

वर नमुद चार्लस ऊर्फ देवराज जेम्स थापा याने सन २०१४ मध्ये पुणे स्थित हॉटेल व्यावसाईकास ०१ कोटीची खंडणी मागितल्या प्रकरणी शिवाजीनगर पो.स्टे., पुणे येथे खंडणी विरोधी पथकाने अटक केली होती.

**वरील कामगिरी ही गुन्हे शाखेचे अपर पोलीस आयुक्त, श्री. प्रदिप देशपांडे सो पोलीस उप-आयुक्त श्री. पंकज डहाणे सो, सहा. पोलीस आयुक्त श्री. समिर शेख सो, यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक श्री. रघुनाथ जाधव, पोलीस उप-निरीक्षक राहुल घुगे, पोलीस कर्मचारी अविनाश मराठे, भाऊसाहेब कोंढरे, रमेश गरुड, उदय काळभोर, महेश कदम, महेश शिंदे, संतोष मते, फिरोज बागवान, शिवानंद बोले यांनी केलेली आहे.**